**परिशिष्ठ – ब**

**( मुंबई नियमन VIII – १८२७ मधील प्रकरण – १ मधील कायदा - ३ )**

**<u>वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate)</u>**

**सांगोला येथील दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात.**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ०४/२०२६**
**निशाणी नं. २३**
**निकाल ता. १६/०४/२०२६**
**न्यायालयीन मुद्रांक रु. २००/-**
**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे**
**Viii २ प्रमाणे**

१. श्रीमती महानंदा विजयकुमार तारळकर, वय ५८ -
२. श्रीमती सृष्टी विजयकुमार तारळकर, वय २१ वर्षे -
३. श्रीमती वृषाली विजयकुमार तारळकर, वय १८ वर्षे -
अर्जदार क्र. १ ते ३ रा. जवळा, ता. सांगोला, जि. सोलापूर. - **अर्जदार**

**विरुध्द**

कोणी नाही - **सामनेवाला**

| **अ.क्र.** | **अर्जदाराचे नांव** | **मयताशी नाते** |
|---|---|---|
| १. | श्रीमती महानंदा विजयकुमार तारळकर | पत्नी |
| २. | श्रीमती सृष्टी विजयकुमार तारळकर | मुलगी |
| ३. | श्रीमती वृषाली विजयकुमार तारळकर | मुलगी |

ज्याअर्थी विजयकुमार भानुदास तारळकर, रा. जवळा, ता. सांगोला, जि. सोलापूर हे दिनांक १५/११/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार ०१ ते ०३ यांनी दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०४/२०२६ दिनांक २२/०१/२०२६ रोजी दाखल करुन त्यामध्ये मयत विजयकुमार भानुदास तारळकर यांचे कायदेशीर वारस आहेत याकामी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केलेले आहे. ज्याअर्थी विजयकुमार भानुदास तारळकर यांचे वारस म्हणून अर्जदार ०१ ते ०३ हे वारस आहेत, असा जाहिरनामा प्रसिध्द केला त्यामध्ये अर्जदार यांचे व्यतिरिक्त वारस म्हणून इतर कोणीही हक्क सांगितलेला नाही. मयत विजयकुमार भानुदास तारळकर यांचे कायदेशीर वारस असलेबाबत सर्व पुरावे अर्जदाराने दाखल केले नंतर **मे. कोर्टाने मयत विजयकुमार भानुदास तारळकर यांचे अर्जदार ०१ ते ०३ यांना कायदेशीर वारस म्हणून घोषित करण्यात आले आहे.**

त्याअर्थी **मयत विजयकुमार भानुदास तारळकर** यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार नं. ०१ ते ०३ यांचे नावे वारस प्रमाणपत्र **(Heirship Certificate)** आजरोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्कयानिशी दिले.

हे वारस प्रमाणपत्र दिले दि. २४/०४/२०२६.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.04.24 17:21:26 +0530

ANAND SHIVAPPA BAMANALLI
Digitally signed by ANAND SHIVAPPA BAMANALLI
Date: 2026.04.24 17:02:04 +0530

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )

सहा.अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सांगोला.

**टिप -१. दिवाणी नियमावली परिच्छेद ३१२ प्रमाणे - मुंबई विधीनियम क्र. VIII १८२७ अन्वये - ज्या व्यक्तिला किंवा त्यांच्यावतीने प्रमाणपत्र मंजूर केलेले आहे त्यांनी प्रमाणपत्र दिल्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत किंवा वेळोवेळी मुदतवाढ दिली असेल त्या कालावधीत न्यायालयाला सर्व मालमत्ता इ. नोंदी आणि सर्व मिळणारे मालमत्ता प्रमाणपत्रामध्ये दिलेली असेल त्या बाबतीत पुढील एका वर्षात किंवा न्यायालयाने दिलेल्या मुदतीत न्यायालयाकडे मालमत्ता बाबतीत सर्व हिशोब त्यात त्याच्याकडे आलेली मालमत्ता किंवा मालमत्तेची कशी विल्हेवाट, त्याबाबतीत दर्शविणारे सर्व हिशोब सादर करावेत.**

**२. वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) मृत व्यक्तीची मालमत्ता अथवा इतर गोष्टीबाबतचे कोणतेही हक्कसंबंध ठरवले जात नाहीत. वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) केवळ कायदेशीर वारस अधिकृत करते.**

**एकुण मुद्रांक रु.२,००/-**

**परिशिष्ठ – ब**

**( मुंबई नियमन VIII – १८२७ मधील प्रकरण – १ मधील कायदा - ३ )**

**मयताच्या वारसाचे / उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Heirship Certificate)**

## सांगोला येथील दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात.

**दि.कि.अर्ज क्र. -०४/ २०२६**

**निकाल तारीख - १६/०४/२०२६**

**निशाणी क्र. - २३**

१. श्रीमती महानंदा विजयकुमार तारळकर, वय ५६

२. सृष्टी विजयकुमार तारळकर, वय २१,

३. वृषाली विजयकुमार तारळकर, वय १८,

अर्जदार नं.१ ते ३ रा. जवळा, ता. सांगोला, - **अर्जदार**

जि.सोलापूर

विरुध्द

कोणी नाही - **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांना मयत विजयकुमार भानुदास तारळकर**,** रा**.** जवळा**,** ता**.** सांगोला जि**.** सोलापूर यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये अर्ज दाखल केला होता.

नियमित जाहिरनामा व दैनिकामध्ये जाहिर नोटीस प्रसिध्द करुनही या अर्जास इतर कोणाचीही हरकत दाखल नाही. ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत** विजयकुमार भानुदास तारळकर यांचे वारस असण्याच्या अधिकाराकरीता समाधानकारक पुरावा दिला आहे. त्याअर्थी अर्जदार यांची मयत वारस यांचे मृत्यु पश्चात दारु विक्रीचे लायसन्स नंबर सी एल -३ क्र. ७९ चे कामी वारसांची नांवे नोंद करणेकामी दाखल **मयत** विजयकुमार भानुदास तारळकर यांचे वारसा अधिनियम १९२५ कलम ३७२ प्रमाणे वारस आहेत हे प्रमाणपत्र अर्जदार यांचे नावे देणेचा या न्यायालयाने आदेश केला आहे.

असे प्रमाणित करणेत येते की, मयत विजयकुमार भानुदास तारळकर यांचे मृत्यूपश्चात दारु विक्रीचे लायसन्स नंबर सी एल -३ क्र. ७९ चे कामी वारसांची नांवे नोंद करणेकरीता अर्जदार नं. १. महानंदा विजयकुमार तारळकर, २. वृषाली विजयकुमार तारळकर आणि अर्जदार नं. ३. सृष्टी विजयकुमार तारळकर , हे सदर मयताचे वारस आहेत. सबब, अर्जदार यांना वारस दाखला माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी आजरोजी अर्जदार यांना दिला.

हे वारस प्रमाणपत्र दिले दिनांक - १७/०४/ २०२६.

( पी. आर. कुलकर्णी )

सहा.अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला

**टिप -१. दिवाणी नियमावली परिच्छेद ३१२ प्रमाणे -** मुंबई विधीनियम क्र. VIII १८२ ७ अन्वये - ज्या व्यक्तिला किंवा त्यांच्यावतीने प्रमाणपत्र मंजूर केलेले आहे त्यांनी प्रमाणपत्र दिल्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत किंवा वेळोवेळी मुदतवाढ दिली असेल त्या कालावधीत न्यायालयाला सर्व मालमत्ता इ. नोंदी आणि सर्व मिळणारे मालमत्ता प्रमाणपत्रामध्ये दिलेली असेल त्या बाबतीत पुढील एका वर्षात किंवा न्यायालयाने दिलेल्या मुदतीत न्यायालयाकडे मालमत्ता बाबतीत सर्व हिशोब त्यात त्याच्याकडे आलेली मालमत्ता किंवा मालमत्तेची कशी विल्हेवाट, त्याबाबतीत दर्शविणारे सर्व हिशोब सादर करावेत.

२. सदरचे वारस प्रमाणपत्र हे फक्त अर्जदार यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे दुयम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पंढरपूर -२ च्या कामासाठीच देण्यात आले.